# खासगी विकसकांनी एसआरए प्रकल्पांकडे वळावे!

पुणे, दि. १ (प्रतिनिधी) - शहरातील सुमारे ४० टक्के लोकसंख्या ही आज झोपडपट्टीमध्ये राहते. हे सारे नागरिक स्वखुशीने झोपडपट्टीत राहत नाहीत. शहराचे सामाजिक स्वास्थ्य सांभाळायचे असेल, तर या नागरिकांना चांगले राहणीमान आणि सुविधा देणे आवश्यक आहे आणि,यासाठी खासगी विकसकांनी एसआरए प्रकल्पांकडे वळणे गरजेचे आहे, असे मत महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. नितीन करीर यांनी व्यक्त केले.

शहरातील नाईकनवरे डेव्हलपर्सच्या 'परिवर्तन' या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे उद्घाटन व सदनिका ग्राहकांना सदनिका हस्तांतरणाचा कार्यक्रम डॉ. करीर यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी 'नाईकनवरे डेव्हलपर्स'चे संचालक हेमंत नाईकनवरे, महापालिका आयुक्त सौरभ राव, क्रेडाई नॅशनलचे अध्यक्ष सतीश मगर, क्रेडाई महाराष्ट्रचे उपाध्यक्ष श्रीकांत परांजपे, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक पाटील, पुणे महापालिकेतील सभागृह नेते श्रीनाथ भिमाले, नगरसेवक धीरज घाटे, स्मिता वस्ते, सरस्वती शेंडगे आदी उपस्थित होते.

## दांडेकर पूल एसआरए प्रकल्पाचे लोकार्पण



करीर म्हणाले, क्रेडाई व महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्री यांच्या सदस्यांनी किमान एक झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प हाती घेत शहराच्या विकासासाठी हातभार लावावा. आज बांधकाम क्षेत्राची परिस्थिती तितकीशी चांगली नाही. मात्र, असे असले तरी तीन ते चार बांधकाम व्यावसायिक एकत्र येत एक एसआरए प्रकल्प हाती घेऊ शकतील. झोपडपट्टीमध्ये राहणारे नागरिकदेखील शहराच्या अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचे आहेत आणि आपणही या शहराचा भाग असून, शहराच्या विकासात योगदान द्यायला हवे, अशी भावना त्यांच्या मनात निर्माण होईल.

एसआरएची स्थापना ही १४ वर्षांपूर्वी झाली. त्यावेळी क्रेडाईने मशाल या सामाजिक संस्थेच्या मदतीने शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये एक सर्व्हे केला गेला. त्याची एक पुस्तिकाही छापली गेली. मात्र, त्या सर्व्हेनंतर एसआरएने याचे गणित मांडत ते विकसकांसमोर ठेवणे अपेक्षित होते. विकसकाने एसआरए प्रकल्प आणल्यानंतर तो तपासत बसणे हे एसआरएचे काम नाही, तर नागरिक व विकसक यामध्ये त्यांनी पुलाचे काम करणे अपेक्षित आहे, असेही डॉ. करीर यांनी नमूद केले.